महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई ● नवी मुंबई ● ठाणे ● पालघर ● रायगड

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रविंद्र घोडविंदे (एम.डी.)

शनिवार ■ ०६ डिसेंबर २०२५ ■ वर्ष - सातवे ■ अंक : १६१ ■ RNI No. MAHMAR/2016/7209 ■ किंमत - ०२ रुपये

## भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भव्य स्मारक प्रगतिपथावर

### शंभर फूट उंचीचा विस्तीर्ण चौथरा ● प्रवेशद्वार इमारत, संशोधन केंद्राची संरचनात्मक कामे पूर्ण

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई, ता. ५ :** महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भव्य स्मारक दादर येथील इंदू मिलच्या जागेत आकाराला आले आहे. मुंबई महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरणाकडून (एमएमआरडीए) १२ एकर जागेत एक हजार ०८९ कोटी रुपये खर्चुन हे स्मारक साकारले जात आहे. या स्मारकातील प्रवेशद्वार इमारत, संशोधन केंद्र, वाचनालय, प्रेक्षागृह, वाहनतळाची शंभर टक्के स्ट्रक्चरल कामे झाली आहेत. सध्या अंतर्गत सजावटीची कामे प्रगतिपथावर असून, बाह्य विकासाची कामेही सुरू आहेत. त्यामुळे वर्षभरात हे दिमाखदार स्मारक खुले होणार आहे.

डॉ. बाबासाहेब यांनी दिलेला समतेचा संदेश जगभरात पोहोचावा, त्यांचे अनमोल कार्य, कायद्याचा अभ्यास, बहुजनांसाठी हक्कासाठी दिलेला लढा आदी बाबींची पुढील पिढ्यांना माहिती व्हावी, त्याचा अभ्यास करता यावा म्हणून राज्य सरकारने इंदू मिलच्या १२ एकर जागेवर ४५० फूट उंचीचे भव्य स्मारक उभारण्याचा निर्णय घेतला होता. त्यानुसार २०१५मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते स्मारकाच्या कामाचे भूमिपूजन करण्यात आले होते. शंभर फूट उंचीचा विस्तीर्ण चौथरा असून, त्याच्या मध्यभागी चैत्य हॉल, लायब्ररी, म्युझियम, विश्रांतिगृह अशा वेगवेगळ्या सुविधा असणार आहेत, तर त्यावर बाबासाहेबांचा ३५० फूट उंचीचा ब्राँझचा पूर्णाकृती पुतळा असणार आहे. त्यापैकी स्मारकातील सहाय्यभूत इमारतींची संरचनात्मक कामे पूर्ण झाली आहेत. त्याचबरोबर अंतर्गत सजावट आणि बाह्य विकासाची कामे सुरू असल्याची माहिती 'एमएमआरडीए'च्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने दिली.

पुतळ्याच्या पॅनेल कास्टिंगचे काम पूर्ण शंभर फूट उंचीच्या स्मारक इमारतीच्या विस्तीर्ण चौथऱ्यावर ३५० फूट उंचीचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा कांस्य धातूचे आवरण असलेला पुतळा उभारला जाणार आहे. पुतळ्याच्या पायथ्याचे काम लवकरच पूर्ण होणार आहे. पुतळ्याच्या आर्मेचर फॅब्रिकेशनचे काम सुरू असून, सहा हजार टन पोलाद लागणार आहे. त्यापैकी १,४०० टन पोलाद आले असून, ६५० टनांचे फॅब्रिकेशन पूर्ण झाले आहे. कांस्य धातूच्या आवरणाचे कामही सुरू असून, पुतळ्याच्या दोन्ही बुटांच्या पॅनेल कास्टिंगचे काम पूर्ण झाले आहे. त्यावरील शिलाई, लेस हुबेहूब दिसत आहे.

## लक्षवेधी



## भिवंडीत एक लाखाचा गावठी दारू साठा हस्तगत

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी ( प्रतिनिधी) :** भिवंडी शहर व ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात चोरून गावठी दारू विक्री व वाहतूक केली जात आहे आहे याबाबत राज्य उत्पादन शुल्क विभाग यांच्याकडे तक्रारी करून सुद्धा दुर्लक्ष केले जात असल्यामुळे आता भिवंडी गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जनार्दन सोनवणे यांनी होणाऱ्या गुन्ह्याची गंभीर दखल घेऊन मिळालेल्या गोपनीय तक्रारीवरून तालुक्यातील आलिमघर येथील एका घराचे खोलीत छापा कारवाई करीत सुमारे एक लाख 11 हजार रुपये किंमतीची 1100 लिटर हातभट्टी दारू मुद्दे मालासह जप्त केली आहे. या प्रकरणी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

भिवंडी तालुक्यातील केवणी खाडी किनारी मोठ्या प्रमाणात गावठी दारू तयार करण्याचे गंभीर प्रकार होत असतात.राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी हे बेकायदेशीरपणे चालणारे दारूचे अड्डे नष्ट करणे अपेक्षित आहे मात्र संबंधित विभाग हे दुर्लक्ष करीत असल्यामुळे भिवंडी शहर व ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात छुप्या मार्गाने गावठी दारू तयार करून दारूची वाहतूक व विक्री होत असल्याचे प्रकार वारंवार उघड होत आहेत, पोलीस वेळोवेळी छापा कारवाई करून हजारो लिटर दारू तयार करण्याचे हातभट्टी नष्ट करीत करून गुन्हे दाखल करीत आरोपींना अटक करीत असतात मात्र आजही भिवंडी परिसरात गावठी दारू मोठ्या प्रमाणात तयार करून त्याची वाहतूक करून विक्री करत असल्याचे प्रकार पोलीस उघडकीस आणत आहेत. भिवंडी गुन्हे शाखेचे पोलीस कर्मचारी किशोर थोरात यांना माहिती मिळाली कि भिवंडी तालुक्यातील

आलिमघर येथील रूपेश नारायण पाटील यांच्या राहते घराचे शेजारी मोठ्या प्रमाणात हातभट्टीचा तयार दारूचा साठा आहे.त्यामुळे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जनार्दन सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि मिथुन भोईर,पोलीस उपनिरीक्षक रामचंद्र जाधव,रविंद्र बी. पाटील, पोह किशोर थोरात,प्रकाश पाटील,

शशिकांत यादव, निलेश बोरसे सर्फराज तडवी या पथकाने रूपेश नारायण पाटील (वय ३५ वर्षे) यांच्या आलिमघर येथील याचे राहते घराचे शेजारी खोलीमध्ये छापा कारवाई करीत सुमारे एक लाख 11 हजार 500 रुपये किमंतीची एक हजार 115 लिटर हातभट्टीची तयार दारू मुद्देमाल हस्तगत केला आहे या प्रकरणी सदर आरोपी विरोधात नारपोली पोलीस ठाण्यात तक्रार गुन्हा दाखल करून आरोपीस ताब्यात घेऊन अटक करण्यात आली आहे.सदरची कारवाई ठाणे गुन्हे शाखेचे पोलीस उपआयुक्त अमरसिंह जाधव,सहाय्यक पोलीस आयुक्त शेखर बागडे यांच्या निर्देशानुसार करण्यात आली.



## यंदा ६२५० हेक्टरवर रब्बीचे नियोजन !

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** ठाणे जिल्ह्यात यंदाच्या रब्बी हंगामासाठी जिल्हा प्रशासनाने नियोजन आखले असून यासाठी विविध स्तरांवर तयारी सुरू आहे. गेल्या वर्षी अंदाजे ५७०० हेक्टर क्षेत्रावर रब्बी लागवड झाली होती. यावर्षी जिल्ह्यातील पेरणी क्षेत्रात अंदाजे ५५० हेक्टरने वाढ होऊन एकूण क्षेत्र ६२५० हेक्टरपर्यंत जाण्याचा अंदाज आहे. या वाढीमुळे जिल्ह्यातील रब्बी पिकांचे उत्पादन आणि उपलब्धता लक्षणीयरीत्या वाढण्याची शक्यता कृषी विभागाकडून वर्तवण्यात येत आहे. यासाठी कृषी विभागाकडून मुबलक प्रमाणात बियाणे देखील उपलब्ध करून देण्यात येत आहेत.

रब्बी हंगाम हा पावसाळ्यानंतर सुरू होणारा आणि थंड हवामानात जोम धरून वाढणाऱ्या पिकांचा हंगाम. साधारणतः ऑक्टोबर-नोव्हेंबर महिन्यात पेरणी केली जाते आणि फेब्रुवारी ते एप्रिलदरम्यान पिकांची काढणी होते. या हंगामात जमिनीत नैसर्गिकरीत्या साठलेला ओलावा, दिवस-रात्रीचे तापमानातील फरक आणि थंड हवामानाचा फायदा घेत अनेक डाळी, गहू, गळीत धान्य, मका व हरभरा यांसारखी पिके चांगली वाढतात.

## अंबरनाथमध्ये भाजपची पाच दिवसीय परिवर्तन पदयात्रा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**अंबरनाथ : शिंदेंच्या शिवसेनेचे वर्चस्व असलेल्या अंबरनाथ नगरपरिषदेतील मतदान दोन दिवस आधी पुढे ढकलल्याने शिवसेनेला मोठा धक्का बसला. मात्र आता भाजपने हीच संधी साधत आक्रमक प्रचाराला सुरुवात केली आहे. शुक्रवारपासून भाजपची अंबरनाथ मध्ये परिवर्तन पदयात्रा सुरू होते आहे. पाच दिवस चालणाऱ्या या अंबरनाथ शहरातील प्रत्येक प्रभाग पिंजून काढला जाणार आहे. यात काही नेतेमंडळी अंबरनाथ मध्ये येण्याची दाट शक्यता आहे. त्यामुळे राजकीय वातावरण तापण्याची शक्यता आहे.**

ठाणे जिल्ह्यातील दोन अ वर्ग नगर परिषदा असलेल्या अंबरनाथ आणि कुळगाव बदलापूर नगर परिषदेच्या निवडणुकांसाठी ४ नोव्हेंबर रोजी घोषणा करण्यात आली होती. दोन्ही ठिकाणी उमेदवार अर्ज भरणे, प्रचार असे सर्व सोपस्कर पार पडले. या दोन्ही ठिकाणी शिंदेंची शिवसेना विरूद्ध भाजप असा थेट सामना रंगला. मात्र ऐन मतदानाच्या दोन दिवस आधी राज्य निवडणूक आयोगाने निवडणुकांना स्थगिती दिली. त्यात अंबरनाथ नगर परिषदेची संपूर्ण निवडणूक स्थगित झाली. या ठिकाणी शिंदेंच्या शिवसेनेने प्रचारात जोर वाढवला होता.

## कल्याण डोंबिवली महापालिकेच्या विविध विकासकामांचे आज मान्यवरांचे हस्ते भूमिपुजन व लोकार्पण!

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

महापालिकेच्या डोंबिवली (पूर्व) येथील सावित्रीबाई फुले रंगमंदिराच्या नुतनीकरणाचे भुमीपूजन आणि डोंबिवली (पूर्व) भुखंड क्र.४९ या सुविधा भुखंडावर प्रेरणा वॉर मेमोरिअल उभारणे या कामाचे लोकार्पण उदया शनिवार दि.०६ डिसेंबर २०२५ रोजी सायंकाळी ५.०० वाजता महाराष्ट्र राज्याचे उप मुख्यमंत्री मा. ना. श्री. एकनाथजी शिंदे यांच्या शुभहस्ते व इतर मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न होणार आहे. डोंबिवली या सांस्कृतिक नगरीतील सावित्रीबाई फुले नाटयगृह हे सांस्कृतिक, शैक्षणिक व सामाजिक कार्यक्रमाकरिता अत्यंत महत्त्वाचे सभागृह आहे. तथापि या नाटयगृहाच्या मुख्य सभागृहाच्या छताचा काही भाग कोसळल्याने सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून दि.२४ मे २०२५ पासून हे नाटयगृह बंद ठेवण्यात आले होते आणि त्याचे संरचनात्मक ऑडिट करुन घेतले असता संपूर्ण इमारतीची मोठया प्रमाणावर दुरुस्ती व नुतनीकरणाची आवश्यकता होती त्यामुळे सदर कामासाठी राज्य शासन स्तरावरुन पहिल्या टप्प्यात रु.१५ कोटी निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

यामध्ये संपूर्ण सभागृहाचे आंतरिक विदयुतीकरण (प्रेक्षागृह,सामायिक मार्ग, रुम्स, अदयावत वॉशरुमसह विदयुत व्यवस्था) ऑडिटोरिअम, साऊंड सिस्टीम, फायर अलार्म सिस्टीमसह फायर पब्लिक ॲड्रेस सिस्टीम तसेच मुख्य छताचे नुतनीकरण ॲकॉस्टीक पॅनेलिंग, फॉलसिलिंग, ग्रीन रुम, व्हीआयपी रुमचे नुतनीकरण, प्रेक्षागृहातील खुर्च्या, कारपेट बसविणे इत्यादी कामांचा समावेश करण्यात आला आहे. सदर काम ६ महिन्याच्या कालावधीत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट असून या प्रकल्पासाठी शासन स्तरावर निधी व प्रशासकिय मान्यता प्राप्त झाली आहे. "प्रेरणा वॉर मेमोरिअल" हे स्मारक कडोंमपा आणि पद्मश्री गजानन माने यांच्या संकल्पनेतून साकार झालेला आणि महापालिका आयुक्त, अतिरिक्त आयुक्त, शहर अभियंता, अतिरिक्त शहर अभियंता (विद्युत) कार्यकारी अभियंता (विशेष प्रकल्प) यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण झालेला प्रकल्प आहे.

## निवडणुकांपूर्वी ठाण्यातील मेट्रोची धाव ?

### विकासकामांच्या आढाव्यासाठी ठाणे महापालिकेत प्रताप सरनाईकांची बैठक

दै. ठाणे जीवनदीप वार्ता


**ठाणे :** ठाण्यातील घोडबंदर भागात मेट्रो चार (वडाळा घाटकोपर-कासारवडवली) प्रकल्पाची कामे सुरु आहेत. ही कामे पूर्णत्वास येत असून डिसेंबरमध्येच या मार्गिकच्या लोकार्पणाचा मानस असल्याची माहिती राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली. परंतु घोडबंदर मार्गावरील मेट्रोच्या काही स्थानकाची कामे अद्यापही अपूर्ण आहेत. तर काही स्थानकांची अंतिम टप्प्यात आहेत. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांपूर्वी मेट्रोची धाव घोडबंदर भागात होईल का असा प्रश्न निर्माण झाला आहे.

ठाणे शहरात मेट्रो चार प्रकल्पाची कामे सुरु आहेत. काही महिन्यांपूर्वीच मेट्रोचे डबे आनंदनगर येथे मेट्रो मार्गिकच्या रुळांवर चढले होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत या मेट्रो मार्गिकवर चाचणी देखील घेण्यात आली होती. त्यानंतर प्रायोगिक तत्त्वावर मेट्रो घोडबंदर मार्गावर चालविण्याबाबत एमएमआरडीएच्या अधिकाऱ्यांमध्ये चर्चा सुरु होती.

शुक्रवारी ओवळा माजिवडा मतदार संघातील विविध विकास कामांचा आढावा घेण्यासाठी ठाणे महापालिका मुख्यालयात प्रताप सरनाईक यांनी बैठक बोलावली होती. डिसेंबरमध्ये या मेट्रो मार्गाचे लोकार्पण होणार असल्याची घोषणा मंत्री प्रताप सरनाईक यांनी केली. असे असले तरी अनेक स्थानकाची कामे अद्याप अपूर्ण आहेत.

त्यामुळे कुठल्या स्थानकावरून ही मेट्रो चालविली जाईल याबद्दल अद्यापही शंका आहे. घोडबंदर येथील वाघबीळ भागात नवे नाट्यगृह उभे राहणार आहे. ठाण्यात राम गणेश गडकरी रंगायतन, डॉ. काशिनाथ घाणेकर नाट्यगृह आहेत. या नाट्यगृहाचे भूमीपूजन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते केले जाणार असल्याचेही सरनाईक म्हणाले.







# महापरिनिर्वाण दिन

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारतीय न्यायशास्त्रज्ञ, अर्थशास्त्रज्ञ तसेच राजकारणी, तत्त्वज्ञ आणि समाजसुधारक होते. प्रथम क्रमांकाचे जागतिक दर्जाचे विद्वान म्हणून ओळखले जात होते. तसेच आपल्या देशातील महान समाजकार्ये केलेले महापुरुष म्हणूनही त्यांची गणना केली जाते. भारतीय राज्यघटना तयार केल्यामुळे त्यांना भारतीय घटनेचे शिल्पकार मानले जाते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे 6 डिसेंबर 1956 रोजी निधन झाले. दरवर्षी बाबासाहेबांच्या पुण्यतिथीचा दिवस हा महापरिनिर्वाण दिवस म्हणून साजरा केला जातो. यावेळी राज्यासह देशभरातील बाबासाहेबांचे लाखो अनुयायी एकत्र येऊन त्यांना आदरांजली अर्पण करतात. मुंबईतील चैत्यभूमी येथे 6 डिसेंबरला त्यांच्यावर बौद्धधर्माच्या पध्दतीने अंतिम संस्कार केले गेले. आंबेडकरांनी लाखो अनुयायांसह बौद्ध धर्म स्वीकारुन ते त्यांचे गुरु झाले. त्यामुळे त्यांच्या पुण्यतिथीसाठी महानिर्वाण हा बौद्ध संकल्पनेतील शब्द वापरण्यात आला आहे. त्यांचे समाधी स्थळ असलेल्या ठिकाणी भारतभरातून असंख्य लोक येतात. लाखो भीम अनुयायी राज्यभरातून येऊन चैत्यभूमी येथील स्तूपात ठेवलेल्या आंबेडकरांच्या अस्थीकलश व प्रतिमेस अभिवादन करतात. त्यांचे दर्शन घेतात. या दिवशी आंबेडकरवादी व्यक्ती बाबासाहेबांची प्रतिमा व मूर्ती समोर ठेवून त्यांच्या स्मृतीस अभिवादन करतात. बौद्ध विहार, स्वतःच्या घरी, सार्वजनिक स्थळी, शाळा, महाविद्यालये, राजकीय नेते व इतर मंडळी आंबेडकर स्मृती स्थळांना वंदन करतात. चैत्यभूमीवर हजारोंच्या संख्येने उर्दू, हिंदी, मराठी, इंग्रजी, तेलगू अशा अनेक भाषांमधून पत्रे पाठवली गेली.

इ.स. 2002 पासून आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन समन्वय समितीची स्थापना करून महानगरपालिका, प्रशासनाशी समन्वय साधून, परिश्रमाने अनुयायांना सेवा सुविधा पुरवण्याचे महान कार्य सुरु केले आहे. इ.स. 2017 मध्ये त्यात आणखी सुधारणा होऊन 15 मिनिटे मौन पाळून बुद्धवंदना म्हणून मानवसमाजाप्रती शिस्तबद्ध मंगलमैत्री करुन महापरिनिर्वाण दिन त्या वर्षापासून आयोजित करण्याचे ठरवले गेले.

महापरिनिर्वाण हा संस्कृत शब्द आहे. याचा अर्थ मुक्ती असा होतो. बौद्ध धर्मातील प्रमुख तत्त्वे आणि उद्दिष्टांपैकी एक असा आहे. याचा अर्थ मृत्युनंतरचे निर्वाण असा होतो. बौद्ध धर्मानुसार जो निर्वाण प्राप्त करतो तो सांसरिक इच्छा आणि जीवनातील दुःख यांच्यापासून मुक्त होईल आणि तो जीवनचक्रातून मुक्त होईल म्हणजेच तो पुन्हा जन्म घेणार नाही. आंबेडकरांनी नेहमीच दलित वर्गाची स्थिती सुधारण्याचे काम केले. अस्पृश्यतेसारखी दृष्ट प्रथा नष्ट करण्यातही त्यांचा मोठा वाटा असल्याचे मान्य करावे लागेल. त्यांचे अनुयायी असे मानतात की, ते गुरु भगवान बुद्धांसारखे अत्यंत्य प्रभावी आणि सद्गुरु होते. त्यांच्या कृतीमुळे त्यांना निर्वाण प्राप्त झाले. त्यामुळे त्यांची पुण्यतिथी ही महापरिनिर्वाण दिन म्हणून ठिकठिकाणी साजरी होताना दिसते. संविधान निर्मात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करुन दिवे व मेणबत्ती पेटवून श्रध्दांजली वाहण्यात येते. त्यांना आदरांजली वाहण्यासाठी दादर येथील चैत्यभूमी येथे अलोट जनसमुदाय लोटतो. बौद्ध भिक्षूसह अनेक लोक पवित्र गीते गातात आणि घोषणाही देतात. येथील स्तूप आंबेडकरवादी जनतेचे आणि बौद्ध अनुयायाचे एक प्रमुख धार्मिक व ऐतिहासिक श्रध्दास्थान झाले आहे.

**लीना बल्लाळ, निवृत्त शिक्षिका व वृत्त पत्र लेखिका ठाणे**

# शिक्षण क्षेत्रातील अन्यायकारक बाबी तातडीने दूर कराव्यात - प्रशांत भामरे



**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे :** राज्यातील शिक्षकांना सध्या विविध स्तरावर गंभीर अडचणींचा सामना करावा लागत आहे. यामध्ये विशेषतः टीईटी परीक्षा, जुनी पेन्शन योजना, संच मान्यता आणि शिक्षण व्यवस्थेतील अनेक अन्यायकारक बाबी यांचा समावेश आहे. सदर समस्यांवर तातडीने निर्णय घेणे अत्यावश्यक आहे. शासनाने शिक्षण क्षेत्रातील अन्यायकारक बाबी दूर कराव्यात असे महाराष्ट्र राज्य शिवछत्रपती शिक्षक संघटनेचे कोकण विभाग अध्यक्ष प्रशांत भामरे यांनी निवेदनाद्वारे म्हटले आहे.

महाराष्ट्र राज्य शिवछत्रपती शिक्षक संघटनेच्या वतीने दिनांक 5 डिसेंबर 2025 रोजी जिल्हाधिकारी कार्यालय ठाणे येथे जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांना शिवछत्रपती शिक्षक संघटनेचे कोकण विभाग अध्यक्ष प्रशांत भामरे, मुख्याध्यापक संघाचे ठाणे जिल्हा अध्यक्ष गणेशजी पाटील, सचिव प्रवीणजी लोंढे, भानुदासजी मडके, चंद्रकांत ठाकूर, सोपान कोळी यांनी महाराष्ट्रातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या अनेक शैक्षणिक समस्या बाबत निवेदन दिले.

यामध्ये सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानुसार देशातील सर्व पहिले ते आठवीच्या शिक्षकांसाठी शिक्षक पात्रता परीक्षा अनिवार्य करण्यात आली आहे. परंतु शिक्षण हक्क कायदा लागु होण्यापूर्वी नियुक्त झालेल्या शिक्षकांसाठी टीईटी परीक्षा अनिवार्य करणे अन्यायकारक आहे. राज्यातील हजारो अनुभवी व गुणवंत शिक्षकांना या निर्णयामुळे अनावश्यक मानसिक ताण व सेवेत अडथळे निर्माण होत आहेत. म्हणूनच राज्य शासनाने या मुद्द्याचा पुन्हा गांभीर्याने विचार करून सर्वोच्च न्यायालयात पुनर्विचार याचिका दाखल करावी व RTE पूर्वी नियुक्त झालेल्या सर्व पात्र शिक्षकांना टीईटीपासून वगळावे.नवीन पेन्शन योजनेमुळे शिक्षकांचे भविष्य आणि असुरक्षित झाले आहे. निवृत्तीनंतर आर्थिक संकट निर्माण होत आहे. 4 मे 2022 च्या न्यायालयीन आदेशाच्या पार्श्वभूमीवर राज्य शासनानने जुनी पेन्शन योजना पुन्हा लागू करावी. संचमान्यतेतील विलंब, विसंगती व असमंजस धोरणामुळे शिक्षकांचा पगार थांबणे, बदलीची समस्या, अतिरिक्त घोषित करणे अशा अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. राज्य शासनाने संच मान्यतेसाठी निश्चित कालमर्यादा, पारदर्शकता आणि तांत्रिक एकसंघ प्रणाली लागू करावी.अनेक परिपत्रके, बदल, धोरणात्मक निर्णय आणि प्रशासकीय विलंब यामुळे शिक्षकांना रोजच्या व्यवहारात गंभीर अडचणी येत आहेत. शासनाने या सर्वांचा समग्र आढावा घेऊन सुधारणा कराव्यात. शिक्षकांच्या सेवाशर्ती प्रतिष्ठा आर्थिक स्थैर्य आणि शैक्षणिक गुणवत्तेशी थेट संबंधित आहेत शिक्षण व्यवस्था सुरळीत ठेवण्यासाठी शासनाने तातडीने सकारात्मक ठोस निर्णय घेणे आवश्यक आहे. या मागण्या राज्य शासनापर्यंत पोहोचवाव्यात असे प्रशांत भामरे यांना निवेदनात आहे.

# एड्स जनजागृतीसाठी बाईक रॅलीला उत्स्फूर्त प्रतिसाद

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**रायगड :** जागतिक एड्स नियंत्रण दिन व पंधरवडा जनजागृती कार्यक्रमाच्या अनुषंगाने युवकांमध्ये एचआयव्ही/एड्स विषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी अलिबाग येथे भव्य बाईक रॅलीचे आयोजन करण्यात आले. अलिबाग समुद्रकिनारा कमानी परिसरातून अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. शीतल जोशी-घुगे यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून रॅलीला सुरुवात झाली.

रॅलीचे आयोजन महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण सोसायटी अंतर्गत जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण विभाग, जिल्हा सामान्य रुग्णालय, अलिबागमार्फत करण्यात आले. यावेळी निवासी वैद्यकीय अधिकारी (बाह्य) डॉ.किरण शिंदे, प्रशासकीय अधिकारी डॉ. प्रवीण कंदाडे, एचओडी पीसीएम नाझिया, एचओडी एसएमटी डॉ. साक्षी पाटील, दालसा मुख्य ॲड. सी. सी. कामथे, लायन्स क्लब श्रीबाग सेन्टिनियलच्या अध्यक्षा निहा घरत, ॲड. निहा राऊत, ॲड. अंकित बंगेरा आदी मान्यवर उपस्थित होते.

रॅलीदरम्यान “अडथळ्यांवर मात करू, एकजुटीने एड्सला लढा देऊ”, “वचन पाळा, एड्स टाळा”, “स्त्री शक्तीचा एकच नारा— एचआयव्ही/एड्स हद्दपार करा” अशा घोषणांद्वारे जनजागृती करण्यात आली. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, होमिओपॅथिक कॉलेज व नर्सिंग स्कूलच्या विद्यार्थ्यांनी उत्साहात सहभाग नोंदवला. महावीर चौक – शिवाजी पुतळा – बालाजी नाका – मारूती रोड मार्गे रॅली पुन्हा समुद्रकिनारी दाखल झाली.



# ‘तूच अमुचा श्वास भीमा तूच अमुची आस भीमा’

हानून पाडू. स्त्री-पुरुषांनी बाबासाहेबांनी दाखवलेल्या मुक्तीच्या वाटेवरून वाटचाल केल्यास आयुष्याला आकार आल्याशिवाय राहणार नाही. बाबासाहेबांनी आपल्या आयुष्यात एकूण 32 पदव्या घेतल्या. ‘ शिक्षणाशिवाय तरुणोपाय नाही’ याची जाणीव तरुणांनी ठेवून शिक्षणाची कास धरणे, अगत्याचे आहे. अन्यथा मेंदूची मशागत न झालेल्या जनतेवर अधिराज्य गाजविणे, हा तर त्यांचा अजेंडा आहेच. आपण शिक्षण घेतले नाही, तर बाबासाहेबांचे औलाद नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आर्थिक न्याय, समानता आणि सर्वांगीण विकासाला महत्त्व दिले. त्यांच्या मते आर्थिक क्षमता नसलेल्या व्यक्तीला स्वातंत्र्य मिळत नाही. त्यामुळे आर्थिक क्षमता स्थापित करणे आवश्यक आहे. आणि आर्थिक क्षमतेसाठी शिक्षणाचा पाया घातलाच गेला पाहिजे. शिक्षण घेतले तरच तुमची ‘ थिंकिंग प्रोसेस’ सुरू होते. जिथे ही प्रोसेस सुरू होते तिथे तुमच्या मन आणि मेंदूवर कोणीही गारुड घालू शकत नाही. मेंदू सुपीक राहिला म्हणजे आपण आपोआप राजकीय, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक दृष्ट्या गुलाम न होता खऱ्या स्वातंत्र्याची गोड फळे चाखतो. देहाने तर आपण स्वतंत्र आहोत. पण मेंदू ने गुलाम झालेले

**हजारो साल नर्गिस अपने बेनुरी पे रोती है,**
**बडी मुश्किल से होता है चमन में दिदावर पैदा!**

अशा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसारख्या सूर्याचा जन्म होण्यासाठी युगायुगांना वाट पाहावी लागते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसारख्या प्रज्ञेचा अभ्यास करायला आपले आयुष्य, ताकद, वेळ, प्रज्ञा तोकडी पडेल. उणेपुरे 65 वर्षांचे लाभलेले आयुष्य. या आयुष्याचे त्यांनी सोने तर केलेच. पण त्यांच्या आयुष्याचा परिस स्पर्श सबंध दलित, वंचित, पीडित, शोषित, कामगार, स्त्रिया, बालके, शेतकरी, शेतमजूर, गरीब यांच्या आयुष्याला लाभला. ज्यांना ज्यांना आपल्या आयुष्याचे सोने करून घ्यायचे आहे. त्यांनी त्यांनी बाबासाहेबांच्या विचारांचा परिस स्पर्श करवून घ्यायचा आहे.

‘डॉ. बाबासाहेब आंबेडकर’ या नावाचा डंका जगभर गाजतो आहे. भारतातल्या संसदेत सत्ताधाऱ्यांना कितीही द्वेषाने बोलू द्या, “ आंबेडकर.. आंबेडकर.. आंबेडकर.. आंबेडकर.. आंबेडकर.. आंबेडकर..आंबेडकर... इतक्या वेळा देवाचे नाव घेतले तर स्वर्ग मिळेल’ अहो, या नावाने तर बहुजनांना या भूवरच स्वर्ग दाखवला आहे. इथला प्रत्येक आंबेडकरी योद्धा आपले आयुष्य त्यांच्यावरून ओवाळून टाकायला क्षणात तयार होईल किंबहुना त्यात आपल्या आयुष्याचे सार्थक मानेल, इतकी ताकद ‘डॉ. भीमराव रामजी आंबेडकर’ या नावात आहे. ‘जयभीम’ च्या नाऱ्याने या या पृथ्वीतलावरील अखंड आंबेडकरी अनुयायांना एकत्र आणण्याची ऊर्जा दिली आहे. आम्ही भावंडं आपसात कितीही भांडलो तरी ‘डॉ. बाबासाहेब आंबेडकर’ या नावाची अस्मिता जपण्यासाठी प्रत्येक वेळी निळ्या निशाणा खाली एक होऊन मनुवादाला टक्कर देण्याची ‘ भीम ताकद’ बाळगून आहोत, याची इथल्या पिलावळीला पूर्ण जाणीव आहे. त्यामुळे मनुवाद्यांनो लक्षात घ्या, हा भिमाचा अनुयायी संपविण्याचा जितका प्रयत्न कराल तितक्या पटीने अनुयायी तयार होतील. शेवटपर्यंत लढण्याची ताकद त्यांच्यात आहे. प्रा. डॉ. संतोष कुलकर्णी यांच्या गझलेत म्हटल्याप्रमाणे,

‘तुझ्यापुढे थोरवी कुणाची टिकेल बाबा,
तुझ्यापुढे विश्वही जरासे झुकेल बाबा’ हे कोणीतरी विश्वगुरूंना सांगा हो.

तुम्ही बाबासाहेबांचे विचार संपवू पाहत आहात, त्यांनी दिलेला धम्म संपवू पाहत आहात, ‘डॉ. बाबासाहेब आंबेडकर’ नावाचा ब्रँड हायजॅक करू पाहत आहात. डॉ. बाबासाहेब आंबेडकर या नावाचे कार्ड वापरून सत्ताधारी बनून त्यांच्याच अनुयायांना आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक गुलाम बनवू पाहत आहात. मनुस्मृतीला विरोध करणारे संविधान तुम्हाला दिवस-रात्र टोचत आहे, खूपत आहे.

बाबासाहेबांच्या अनुयायांनो, मनुवाद्यांचा डाव ध्यानात घ्या. ‘आम्ही जात, धर्म, लिंग, पंथ वेगळे मानत नाही’, असे कार्यक्रमांमधून व्यक्त करणाऱ्या समरसतावाद्यांचा डाव ध्यानात घ्या. वैयक्तिक स्वार्थासाठी कोणाच्याही दावणीला स्वतःला बांधून घेऊ नका. ‘आत्मविश्वासाने माणूस कोणतीही गोष्ट करू शकतो’ हा बाबासाहेबांनी दिलेला संदेश आजच्या परिस्थितीत तरी आपल्याला विसरून चालणार नाही. संघटन केले तरच बाबासाहेबांनी दिलेल्या हक्कांसाठी आपण लढा देऊ शकू. उद्याची पिढी आज आम्ही तयार केली नाही, तर तीच पिढी आपल्याला जाबही विचारणार आहे.

मनुवादाने तुम्हाला संपविण्याचा आखलेला डाव पारतंत्र्य पिढ्यान पिढ्यांना गुलामीत ढकलणारे आहे.

अशोक वानखडे यांच्या गझलेत उल्लेख केल्याप्रमाणे ‘तुला वाचले अन, घडू लागलो, तुला वाचल्यावर लढू लागलो’ ही ताकद आम्हाला आंबेडकरी तत्त्वज्ञानाने दिली आहे. सत्ताधाऱ्यांनो, विकसित भारत म्हणजे सामाजिक समता आणि न्याय होय. हा विकास प्रत्येक भारतीय नागरिकाचा होणे आवश्यक आहे. बहुजनांसाठी कुंपण घालून कुंपणाच्या आत विकास करणे म्हणजेच ‘हिंदुस्थान’ आणि ‘भारत’ असे देशाचे दोन तुकडे करून वरून मानभावीपणे देशप्रेम ( की धर्म प्रेम ) दाखविणे व इथल्या निष्पाप जनतेला देशद्रोही ठरविणे होय. ज्या बाबासाहेबांनी धर्मनिरपेक्षतेच्या नावाखाली देशातील नागरिकांना एकत्र आणण्याचा प्रयत्न केला, त्याच देशातील नागरिकांना धर्माच्या नावाखाली वेगळे करून देशातील नागरिकांना धर्मांध करण्याचा क्रूर डाव साधला जात आहे. यासाठी चित्रपटांचे वेगळे राजकारण केले जात आहे. अराजकता पसरवून भारताला ‘महासत्ता’ बनविण्याचे गाजर दाखवू नका.

डॉ. अविनाश सांगोलेकर आपल्या गझलेत म्हणतात त्याप्रमाणे, ‘तूच अमुचा श्वास भीमा, तूच अमुची आस भीमा, तू जरी नाहीस येथे, सारखा तव भास भीमा’ मानवतेचा पुरस्कार करणाऱ्या या महामानवाला त्रिवार अभिवादन!



**डॉ. अनुप्रिया गायकवाड-खोब्रागडे**
**संपर्क - 8286407380**

# मध्य रेल्वेच्या व्हीजीलन्स विभागाचा कल्याण पूर्वेतील पार्किंगवर छापा

## बनावट पावती पुस्तक मिळाल्याने पार्किंगच्या चालकास अटक

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** मध्य रेल्वेच्या व्हिजीलन्स विभागाने कल्याण पूर्वेतील रेल्वे हद्दीत चालविल्या जाणाऱ्या पे अ'ण्ड पार्कवर छापा टाकला असता चालकाकचे बनावटी पावती पूस्तक मिळून आले. प्रशासनाच्या डोळ्यात धूळफेक करुन हे पार्किंग चालविले जात असल्याची बाब व्हिजिलन्स विभागाच्या निदर्शनास आली आहे. पार्किंग चालविणारा हरिशंकर प्रजापती याला कारवाई पथकाने अटक केली आहे. कारवाई पथकातील एकाने पार्किंगवर गाडी पार्क केली. त्याठीकाणी पावती घेतली. त्या पावतीवर डीएस इंटरप्रायझेस साईट एम असे लिहिले होते. कारवाई पथकातील अधिकाऱ्यास संशय आला. त्याने त्याला दिलेली पावती तपासून पाहिली असता ती पावती बनावट असल्याचे आढळून आले. देण्यात आलेली पावती पार्किंग चालकाने स्वत:



छापली होती. त्याठिकाणी कागदपत्र मिळून आले. ते कागदपत्रही बनावट असल्याचे प्राथमिक तपासात उघड झाले आहे. या प्रकरणी कारवाई पथकाने हरिशंकर प्रजापती याला ताब्यात घेऊन आरपीएफच्या हवाली केले आहे. आरपीएफकडून पुढील तपास सुरु आहे. हे पार्किंग प्रजापती कधीपासून चालवित होता. त्याने रेल्वे प्रशासनाची फसवणूक केली आहे. त्यातून त्याने किती माया गोळा केली ? या कामात त्याला रेल्वे अधिकारी आणि अन्य कोणत्या अधिकारी वर्गाची साथ होती का ? या विविध अंगाने तपास सुरु करण्यात आला आहे.

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
https://www.facebook.com/jeevandeepnews/
https://www.instagram.com/thane_jeevandeep/
https://x.com/Jeevandeepvarta
https://jeevandeepvarta.com/

# भविष्यवेध



शनिवार
०६ डिसेंबर २०२५

**मेष**
कामाच्या ठिकाणी तुम्हाला तुमच्या सहकाऱ्यांकडून पाठिंबा मिळेल आणि तुमचे कनिष्ठ तुमच्याकडून शिकण्याची इच्छा व्यक्त करतील.

**वृषभ**
तुमच्या जोडीदाराशी तुमचे संबंध सुधारतील. आज तुमच्या कामात राजकीय संबंधांचा तुम्हाला फायदा होईल. कुटुंबात आनंदी वातावरण असेल.

**मिथुन**
तुमच्या वैवाहिक जीवनात सुसंवाद राखल्याने आनंद वाढेल. आज तुम्ही निरोगी आणि तंदुरुस्त राहाल. तुमचा दिवस नव्या उत्साहाने सुरू होईल.

**कर्क**
तुमच्या जवळच्या नातेवाईकांकडून तुम्हाला आर्थिक मदत मिळेल. तथापि, आर्थिक व्यवहारात तुम्हाला सावधगिरी बाळगण्याची आवश्यकता आहे.

**सिंह**
काम आणि कौटुंबिक संबंधांमध्ये संतुलन राखाल. एखादे काम पूर्ण करण्यासाठी तुम्ही नवीन मार्गांचा विचार कराल. तुमची आर्थिक परिस्थिती मजबूत राहील.

**कन्या**
दिवस आत्मविश्वासाने भरलेला असेल. जर आयुष्याच्या धावपळीत हरवलेले वाटत असेल, तर स्वतःसाठी थोडा वेळ काढा आणि व्यक्तिमत्त्वाचे मूल्यांकन करा.

**तुळ**
तब्येत सांभाळा . व्यवसायासाठी तुम्हाला प्रवास करावा लागू शकतो. तुमचे काम व्यवस्थित पूर्ण होईल. दैनंदिन जीवनात काहीतरी नवीन येऊ शकते.

**वृश्चिक**
रखडलेले व्यावसायिक प्रकल्प पुन्हा सुरू केल्याने तुमची व्यस्तता वाढेल. आज नेमलेली कामे वेळेवर पूर्ण करा, अन्यथा वरिष्ठांकडून ओरडा ऐकावा लागू शकतो.

**धनु**
तुमच्याभोवती सकारात्मक ऊर्जा असेल. लोक तुमच्या वागण्याने खूश होतील. आज तुम्हाला अपेक्षेपेक्षा जास्त आर्थिक फायदा होण्याची शक्यता आहे.

**मकर**
तुम्ही जे काही हाती घ्याल ते यशस्वी होईल. तुमचे आरोग्य पूर्वीपेक्षा चांगले राहील. तुमचा व्यवसाय वाढवण्यासाठी एखादा नातेवाईक तुम्हाला सूचना देतील.

**कुंभ**
अनावश्यक चिंतांपासून मुक्त होऊन तुम्ही मंदिर किंवा धार्मिक स्थळी वेळ घालवाल. सहलीला जाण्याची शक्यता आहे. विद्यार्थ्यांना यश मिळण्याची शक्यता आहे.

**मिन**
अभ्यासात अधिक मेहनत घ्यावी लागेल. आज तुम्ही तुमच्या कुटुंबासोबत वेळ घालवू शकाल, ज्यामुळे आनंदी वातावरण निर्माण होईल. मन समाधानी असेल.

# आ. सुलभा गायकवाड यांनी केली धर्मवीर आनंद दिघे पुलाच्या कामाची पाहणी




## 4 ते 5 दिवसांत यातील त्रुटी दूर न केल्यास हा ब्रिज पुन्हा बंद करण्याचा इशारा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** कल्याण पूर्व आणि पश्चिमेला जोडणाऱ्या धर्मवीर आनंद दिघे पूल हा डागडुजीसाठी बंद करण्यात आला होता. या पुलाच्या कामाची कल्याण पूर्वच्या भाजपा आमदार सुलभा गायकवाड यांनी केडीएमसी अधिकारी आणि भाजपा पदाधिकारी यांच्यासमवेत पाहणी केली. या पुलाचे काम हे काही ठिकाणी समाधानकारक नसून येत्या 4 ते 5 दिवसांत यातील त्रुटी दूर न केल्यास हा ब्रिज पुन्हा बंद करण्याचा इशारा यावेळी आमदार सुलभा गायकवाड यांनी देत, वाहनचालकांची आणि नागरिकांची होणारी गैरसोय लक्षात घेता आज शुक्रवारीच हा ब्रिज वाहतुकीसाठी खुला करण्यात येणार असल्याचे गायकवाड यांनी सांगितले. तर आगामी काळात वालधुनी ब्रिज आणि प्रल्हाद शिंदे पुलाची देखील लवकरच डागडुजी करण्यात येणार असल्याचे आमदार सुलभा गायकवाड यांनी सांगत नागरिकांनी सहकार्य करण्याचे आवाहन केले.

पावसाळयात झालेल्या खड्डयांमुळे शहाड येथील उड्डाणपूल काही दिवस बंद ठेवून त्या पुलाची डागडुजी करण्यात आली. हा पूल बंद ठेवल्याने कल्याण सह आजूबाजूच्या परिसरात मोठ्या वाहतूक कोंडीचा सामना करावा लागला होता. त्यानंतर वालधुनी परिसरात कल्याण पूर्व पश्चिमला जोडणारा धर्मवीर आनंद दिघे उड्डाणपूल देखील डागडुजीसाठी बंद करण्यात आला होता. हा उड्डाण पूल नागरिकांच्या सोयीसाठी आजपासून वाहतुकीसाठी उपलब्ध करून देण्यात आला आहे.

वाहनचालकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत या पुलाचे आवश्यक त्या ठिकाणी पुनः डांबरीकरण करण्यात आले आहे. कामाची गुणवत्ता, सुरक्षितता व अंतिम तयारी यांची आज मी प्रत्यक्ष पाहणी करून संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक ते आदेश दिले. या पाहणीदरम्यान कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या कार्यकारी अभियंता रोहिणी लोकरे, कल्याण पूर्व विधानसभा निवडणूक प्रमुख संजय मोरे, माजी नगरसेवक अभिमन्यू गायकवाड, मनोज राय, प्रमोद पिंगळे, मंडळ अध्यक्ष विजय उपाध्याय तसेच इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

**ई निविदा सुचना क्र.०४ सन २०२५-२६ (द्वितीय पुकार)**

कार्यकारी अभियंता, मजीप्रा विभाग, ठाणे यांचेकडुन त्यांचे कार्यालयासाठी व त्यांच्या अधिपत्याखालील असलेल्या उपविभाग कार्यालयाच्या वापरासाठी आवश्यक असलेल्या बिगर वातानुकुलीत वाहतुक परवाना असलेली भाडे तत्वावरील खाजगी वाहने वाहनचालक, इंधन, देखभाल दुरुस्ती व टोल टॅक्स....इ. सह एका वर्षाकरीता पुरवठा करणेसाठीची ई निविदा "ड" नमुन्यामध्ये मागविण्यात येत आहे. या कामाची अंदाजित किंमत रु. ३२,६५,८००/- इतकी आहे.

सदर कामासंबंधीचा सविस्तर तपशिल दि.०९.१२.२०२५ रोजी https:// www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

**सही /-**
**उप कार्यकारी अभियंता**
**मजीप्रा विभाग, ठाणे**

**जा.क्र.जिमाका /ठाणे/जाहि/2025-26/130**

# मधूकर देशमुख यांची राष्ट्रवादी काँग्रेस किसान सभा ठाणे जिल्हाध्यक्षपदी निवड

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**शहापूर ग्रामीण** : राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी किसान सभा ठाणे जिल्हाध्यक्षपदी मधूकर शांताराम देशमुख यांची नियुक्ती करण्यात आली आहे.



पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री अजित पवार, प्रदेशाध्यक्ष खा. सुनिल तटकरे यांच्या मार्गदर्शन व नेतृत्वाखाली पक्षाचे ध्येय-धोरणे सर्व सामान्य पर्यंत पोहचवण्यासाठी व शेतकऱ्यांच्या विविध समस्या सोडवून जीवनात सुख समृद्धी येण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस किसान सभा मजबूत करण्यासाठी रा.काँ. किसान सभेचे महाराष्ट्र राज्य अध्यक्ष ॲड. वसंतराव मनकर यांनी नियुक्तीपत्र देऊन निवड केली आहे.

दरम्यान, या मिळालेल्या पदभार नुसार जिल्ह्यातील पक्ष संघटना वाढीबरोबरच शेतकरी व सर्व सामान्य जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्नशील राहणार असल्याचे मधूकर देशमुख यांनी म्हटले आहे.

# पळसोली येथे शेतकरी प्रशिक्षणाचे आयोजन




दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**शहापूर ग्रामीण :** वासिंद जवळील पळसोली येथे दिनांक २/१२/ २०२५ रोजी आत्मा अंतर्गत जिल्हाअंतर्गत शेतकरी प्रशिक्षणाचे आयोजन मा.पाचे साहेब प्रकल्प संचालक आत्मा ठाणे तथा जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी ठाणे यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आले सदर प्रशिक्षणामध्ये डॉ. नामदेव म्हसकर,सर कृषिविद्यवेता, प्रादेशिक कृषी संशोधन केंद्र कर्जत यांनी कडधान्य पीक लागवड व व्यवस्थापन,आंबा मोहर संरक्षण याविषयी मार्गदर्शन केले. मा.पाचे साहेब, प्रकल्प संचालक आत्मा ठाणे तथा जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी ठाणे यांनी कृषी विभागाच्या योजना, सेंद्रिय शेती नाविन्यपूर्ण उपक्रम राबवणे याविषयी शेतकऱ्यांना सविस्तर मार्गदर्शन केले. राकेश राय,खर्डी यांनी ड्रोन द्रोणद्वारे कीटकनाशक फवारणी व फोटोग्राफी याविषयी मार्गदर्शन केले.तर सुनील भिसे ,शेतीनिष्ठ पुरस्कार प्राप्त शेतकरी, नाशिक यांनी सेंद्रिय निविष्ठा तयार करणे, फळबाग लागवड व्यवस्थापन याविषयी मार्गदर्शन केले. रवींद्र घुडे, मंडळ कृषी अधिकारी, कल्याण,यांनी हरभरा लागवड व्यवस्थापन, महाविस्तार ॲप डाऊनलोड करणे याविषयी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन वैशाली भापसे,तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक यांनी केले.सदर कार्यक्रमाचे नियोजन रामेश्वर खेडेकर सहायक कृषी अधिकारी नडगाव यांनी केले. कार्यक्रमासाठी विकास जाधव, सरपंच, फळेगाव महेश आगिवले,उपसरपंच फळेगाव, रमेश बांगर, माजी पंचायत समिती सदस्य,कल्याण, श्रीराम पालवी,शेतीनिष्ठ पुरस्कार प्राप्त शेतकरी कोसले, विजय पाटील,उपकृषी अधिकारी,खडवली, प्रवीण बिन्हाडे,उपकृषी अधिकारी, मामनोली, प्रसाद भोकरे,सहाय्यक कृषी अधिकारी गेरसे,अर्चना सांबरे ,सहाय्यक कृषी अधिकारी मांडा , भगवान तारमळे, रुपेश पितांबरे, गोरजेश्वर शेतकरी उत्पादक कंपनी उशीद व मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते.

# 107 तितर पक्षी मृतावस्थेत आढळले

## डोंबिवलीच्या मोठागाव ठाकुर्ली सातपूल परिसरातील घटना

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**डोंबिवली :** मोठागाव-ठाकुर्ली सातपूल परिसरात शुक्रवारी (ता. ५) मोठी धक्कादायक घटना समोर आली आहे. परिसरात तब्बल १०७ तितर पक्षी मृतावस्थेत आढळल्याने एकच खळबळ उडाली आहे. ही माहिती मिळताच स्थानिकांनी मोठी गर्दी घटनास्थळी केली होती.

प्राथमिक माहितीनुसार, काही नागरिकांना रस्त्याच्या कडेला आणि झाडीच्या बाजूला मोठ्या प्रमाणात मृत पक्षी पडलेले दिसले. त्यांनी तातडीने गावातील इतरांना माहिती दिली. तसेच पोलिस कर्मचारी आणि वन विभागालाही कळवले. सूचना मिळताच वन विभागाचे अधिकारी तातडीने घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी सर्व मृत पक्षी ताब्यात घेतले. पंचनामा करून सर्व पक्ष्यांचे पोस्टमार्टमसाठी पाठविण्यात आले आहे.

### सर्व शक्यता तपासणार

या घटनेमागील कारण अद्याप स्पष्ट झाले नाही. हे पक्षी नैसर्गिक कारणाने मृत झाले की त्यांना विषबाधा झाली, की कोणी मुद्दाम मारून येथे टाकले. या सर्व शक्यता वन विभाग तपासत आहेत. या प्रकरणाचा तपास ठाणे उपवनसंरक्षक सचिन रेपाळे, ठाणे वन्यजीव अधिकारी सोनल वळवी, तसेच इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. वन विभागाकडून अशीही माहिती देण्यात आली की, परिसराची पाहणी करून नमुने गोळा करण्यात आले आहेत. अहवाल आल्यानंतर पुढील कारवाई निश्चित केली जाईल.

# अपघातग्रस्त जीवन पाटील यांना उपचारांसाठी आर्थिक मदतीची गरज

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण :** कोकण ज्ञानपीठाचे माजी विद्यार्थी उरण मधील मोठीजुई गावचे रहिवासी असलेले जीवन आत्माराम पाटील सध्या अतिदक्ष अवस्थेत आहेत. गंभीर प्रकृतीमुळे त्यांना त्वरित अपोलो हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले असून, पुढील उपचारांसाठी अंदाजे ३५ लाख रुपयांचा खर्च अपेक्षित आहे.

कुटुंबाची आर्थिक परिस्थिती मर्यादित असल्याने उपचारासाठी आवश्यक असलेली मोठी रक्कम उभारणे कठीण बनले आहे. त्यामुळे मित्रपरिवार, सामाजिक कार्यकर्ते आणि सर्वसामान्य नागरिकांकडून आर्थिक मदतीचे आवाहन करण्यात येत आहे.

समूहातील सदस्यांनी सांगितले की, "आपल्या परीने दिलेली छोटीशी मदतसुद्धा जीवनच्या उपचारांसाठी मोठा आधार ठरेल. एका अपघातग्रस्त मित्राला वाचवण्यासाठी समाजाने एकत्र येण्याची ही वेळ आहे."उपचारासाठी आवश्यक निधी गोळा करण्यासाठी

**सहकार्यासाठी बँक तपशील :**
**Acc. Name: Hemant Maya Patil**
**Bank: State Bank of India**
**Account No.: 41242190578**
**IFSC: SBIN0009832**




विविध माध्यमांद्वारे सहकार्याची व्यवस्था करण्यात आली आहे. इच्छुक दात्यांसाठी GPay / PhonePe / Paytm UPI कोड तसेच बँक खात्याचे तपशील देण्यात आले आहेत, ज्याद्वारे थेट रक्कम जमा करता येईल.

समाजाने पुढाकार घेऊन दिलेली मदत जीवन पाटील यांच्या उपचारांसाठी आशेचा आधार ठरेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

# आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर वाचन उपयोगीच पडते

## - मंदार धर्माधिकारी



अखंड वाचनयज्ञ उपक्रमाचा उद्‌घाटन समारंभ संपन्न

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** "शालेय व महाविद्यालयीन जीवनात वाचलेली पुस्तके आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर आपल्याला उपयोगी पडतात. आयुष्यातील कोणत्याही प्रसंगात निर्णय घेताना पुस्तकातील संचित ज्ञान आपल्याला सुयोग्य निर्णय घेताना मदतकारी ठरते. त्यामुळे तुम्ही मुलांनी भरपूर वाचन केले पाहिजे." असे प्रतिपादन माजी एसीपी आणि लेखक मंदार धर्माधिकारी यांनी केले. अक्षरमंच सामाजिक सांस्कृतिक प्रतिष्ठानचे वतीने आयोजित करण्यात आलेल्या सलग ३६ तास व एकत्रित ३०० अखंड वाचन यज्ञ उपक्रमाचे उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते.

या प्रसंगी पुस्तक आदान प्रदान चळवळीचे संकल्पनाकार पुंडलिक पै यांनी मुलांनी कोणती पुस्तके वाचावी या विषयी मार्गदर्शन केले तर कल्याण पश्चिमचे माजी आमदार प्रकाश भोईर यांनी वाचनातून आपण कसे घडलो आणि आजही आपले वाचन कसे सुरू असते हे विविध प्रसंगातून उलगडून दाखविले. ॲड विवेक बिवलकर यांनी वाचनाचे बदलते स्वरूप याविषयी माहिती दिली. अखंड वाचनयज्ञ उपक्रमाचे संकल्पनाकार योगेश जोशी या उपक्रमाची प्रेरणा कशी मिळाली आणि हा उपक्रम कसा साकारत गेला हे आपल्या प्रास्ताविकातून मांडले.

५ डिसेंबर ला सकाळी ८ वाजता सुरू झालेला हा उपक्रम ६ डिसेंबर सायंकाळी ८ वाजेपर्यंत सुरू राहणार आहे. उद्घाटन समारंभानंतर बालक मंदिर संस्था येथील वि. आ. बुवा वाचन नगरी, भारताचार्य चिंतामणराव वैद्य सभागृह, डॉ जयंत नारळीकर वाचन कट्टा, योगानंद क्लासेस येथील बाळ कोल्हटकर वाचन कट्टा येथे तसेच एकूण २५ शाळांमधून विविध विषयांवरचे वाचन सुरू झाले. गेल्यावर्षी या उपक्रमात १६७८ वाचक सहभागी झाले होते तर यावर्षी २५०० हून अधिक वाचक सहभागी होणार असल्याचे सचिव हेमंत नेहते यांनी सांगितले. या उपक्रमात चित्रकार प्रदीप जोशी यांनी रेखाटलेल्या साहित्यिकांच्या रेखाचित्रांचे प्रदर्शन हे विशेष आकर्षण ठरत आहेत.

# सोनुभाऊ बसवंत महाविद्यालय येथे रक्तदान शिबीर

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**शहापूर ग्रामीण** : सोनुभाऊ बसवंत महाविद्यालय, शहापूर या महाविद्यालयातील अंतर्गत गुणवत्ता निर्धारण कक्ष, एन. सी.सी., एन.एस. एस., सांस्कृतिक विभाग, स्पोर्टस् विभाग, आणि महिला विकास कक्ष व एच.डी.एफ.सी. बँक (परिवर्तन), आणि जे. जे. महानगर रक्तपेढी, मुंबई (शासकीय रक्तपेढी) यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान असून, एका रक्तदात्यामुळे अनेक जीव वाचू शकतात. तसेच रक्तदान म्हणजे जीवनदान आहे, हे लक्षात घेऊन तसेच विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकीची जाणीव निर्माण करण्यासाठी आणि समाजाच्या आरोग्यसेवेत योगदान देण्याच्या उद्देशाने मंगळवार दि. 9 नोव्हेंबर 025 रोजी हे शिबिर होणार आहे.

सदर, यावेळी रक्तदान करणाऱ्या सर्व रक्तदात्यांना प्रमाणपत्र व एक भेटवस्तू देण्यात येणार असून या शिबिरात अधिकाधिक आजी व माजी विद्यार्थ्यी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी, तसेच स्थानिक नागरिक इत्यादींनी सहभाग घेऊन रक्तदान करावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# धर्मवीर आनंद दिघे पूल शिवसेनेकडून खुला

दै. ठाणे जीवनदीप वार्ता



**कल्याण :** कल्याण शहरातील धर्मवीर आनंद दिघे पुलाचे उद्‌घाटन कोण करणार यावरून आज शिवसेना आणि भाजप मधील राजकीय वातावरण चांगलेच तापले. आज सकाळी भाजप आमदार सुलभा गायकवाड यांनी पुलाची पाहणी करून संध्याकाळी पूल खुला होणार असे सांगितले होते. भाजपकडून आज संध्याकाळी पाच वाजता पुलाचे अधिकृत उद्‌घाटन होणार होते. मात्र, त्यापूर्वीच शिवसेनेने अचानक कृती करत पूल वाहतुकीसाठी खुला केल्याची घोषणा केली. त्यामुळे पूल आज दुपारीच नागरिकांसाठी खुला करण्यात आला. यावर शिवसेनेने स्पष्ट भूमिका घेतली की, हे श्रेयासाठी केलेले काम नाही. नागरिकांची गैरसोय होऊ नये म्हणून पूल तत्काळ सुरू केला असल्याचे विधानसभा संपर्क प्रमुख महेश गायकवाड आणि शहर प्रमुख निलेश शिंदे यांनी सांगितले. यावेळी माजी नगरसेवक मल्लेश शेट्टी, नवीन गवळी, प्रमोद पिंगळे आदींसह शिवसेना पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## कल्याण डोंबिवली महानगरपालिका

### जाहिर सुचना

ज्याअर्थी, कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील २७ गावामधील प्रभाग क. १२१ निळजे गाव येथील बँक ऑफ बडोदा समोरील १८.०० मी. विकास योजना रस्त्यापासून बुध्द विहार तसेच चंद्रेश कुंज पर्यंत हा अस्तित्वातील रस्ता सरासरी ८.०० मी. रुंदीचा विद्यमान रस्ता आहे. सदरहू २७ गावाच्या मंजुर विकास योजनेमध्ये नसल्याने सदर रस्ता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील १९४९ चे कलम २१० अन्वये विकसित करण्याचा महानगरपालिकेचा मानस आहे.

ज्याअर्थी सदर रस्त्याचे प्रत्यक्ष जागेवर सर्व्हेक्षण करण्यात आले असून, सर्व्हेक्षण नकाशावर (A-B-C) याप्रमाणे दर्शविण्यात आलेला आहे. २७ गावांच्या मंजुर विकास योजनेत सदर विद्यमान रस्त्यास रूंदीकरण प्रस्तावीत करण्यात आले नाही. त्याअनुषंगाने सदर परिसरातील दिवसेंदिवस वाढणारी लोकसंख्या व तसेच त्याप्रमाणे वाढणारी वाहतूक व आरोग्य सेवा इ. बाबींचा विचार करुन जनहिताच्या दृष्टिने उक्त रस्ता ९.०० मी. रूंद करण्याचा कल्याण डोंबिवली महानगरपालिकेचा मानस आहे. सदर रस्त्याच्या दोन्ही बाजूंच्या रूपेरषा मा. आयुक्त महोदय यांनी दि. ३१/१०/२०२५ रोजीच्या मान्यतेने विहीत करण्यात आलेली आहे.

त्याअर्थी, या जाहिर सुचनेव्दारे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २१० मधील तरतुदीनुसार सदर परीसरातील तसेच कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या हद्दीतील सर्व नागरीकांना या जाहिर सुचनेव्दारे कळविण्यात येते की, उक्त रस्ता ९.०० मी. रुंद करुन त्या रस्त्याच्या दोन्ही बाजूंच्या रेषा कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या नगररचना विभागात उपलब्ध असलेल्या नकाशाप्रमाणे विहीत करण्यात येत आहेत.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २१० प्रमाणे कोणीही वरील प्रमाणे विहित केलेल्या सदर रस्त्यांच्या रेषेत कोणत्याही प्रकारचे बांधकाम करू शकणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

१) नोटीस प्रसिध्द झालेल्या दिनांका पासुन एक महिन्याच्या मुदतीत आपल्या सुचना व हरकती असल्यास मा. प्रशासक तथा आयुक्त, कल्याण डोंबिवली महानगरपालिका द्वारा सचिव, कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण यांचेकडे लेखी स्वरूपात द्याव्यात.

२) सदर नोटीस व नकाशाची प्रत नागरिकांच्या माहितीसाठी नगररचना विभाग मुख्यालय नोटीस बोर्डवर व "ई प्रभाग क्षेत्र" कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर लावण्यात आली आहे.

**सही /-**
**सहाय्यक संचालक नगररचना**
**कल्याण डोंबिवली महानगरपालिका**
**कल्याण**

**जा. क्र. कडोंमपा/जसंवि/मुका/७५९**
**दिनांक : ०५/१२/२०२५**



# टीईटी सक्तीविरोधात शिक्षकांचा संताप : काळ्याफिती लावून शिक्षण क्रांती संघटनेचे आंदोलन

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे :** राज्यातील खाजगी अनुदानित, अंशतः अनुदानित, विनाअनुदानित शाळेतील मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) सक्तीच्या निर्णयासह राज्य शासनाचे विरोधात विविध संघटनांनी दि.05 डिसेंबर 2025 रोजी एक दिवसीय शाळा बंद आंदोलनाची हाक दिली होती.

याच वेळी शिक्षण संचालक यांनी शाळा बंद ठेवल्यास शिक्षकांचे त्या एका दिवसाचे वेतन कापण्याचा आदेश काढला होता. या वेतन कपातीची झळ शिक्षकांना लागू नये याची काळजी घेऊन व त्याचबरोबर शिक्षण व्यवस्थेतील विविध मागण्यांसाठी व शिक्षकांमध्ये असलेला असंतोष प्रदर्शित करण्यासाठी महाराष्ट्र राज्य शिक्षण क्रांती



संघटनेचे राज्याध्यक्ष सुधीर घागस व कोकण विभाग अध्यक्ष रमेश जाधव यांचे मार्गदर्शनाखाली महाराष्ट्र राज्य शिक्षण क्रांती संघटनेच्या शाळा बंद ऐवजी शाळेत काळया फिती लावून आंदोलन करावे या आवाहनाला साथ देऊन दि.05 डिसेंबर 2025 रोजी ठाणे जिल्हातील अनेक शाळांतील मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी काळय फिती लावून आंदोलन केले.

# रासायनिक पाणी नदीत सोडल्यामुळे कामवारी नदीचे पाणी प्रदूषित

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**भिवंडी :** भिवंडी शहराच्या प्रवेशद्वारावरून वाहणाऱ्या कामवारी नदीचे पाणी गेल्या दिवसांपासून प्रदुषित झाल्याने पाण्याचा रंग बदल होऊन पिवळा झाला आहे.नदीच्या आजूबाजूला कापडावर रंगाची प्रक्रिया करणाऱ्या डाईंग मधून केमिकलचे (रासायनिक) पाणी नदीच्या पाण्यात सोडल्यामुळे नदीचे पाणी प्रदूषित होत असल्याची माहिती परिसरातील नागरिकांनी दिली.नदीचे पाणी प्रदुषित झाल्यामुळे नदी मधील मासे व जीवजंतू अनेकवेळा मृत्यू पावल्याच्या घटना उघड झाल्या आहेत.या गंभीर प्रकार बाबत प्रदूषण नियंत्रण मंडळ, महापालिका प्रशासन तसेच महसूल अधिकाऱ्यांना माहिती देण्यात आलेली आहे मात्र सर्व प्रशासकीय यंत्रणे या गंभीर प्रश्नाकडे दुर्लक्ष करीत असल्यामुळे कामवारी नदी ही प्रदूषणाच्या विळख्यात सापडल्याचे सध्या चित्र आहे.त्यामुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या बाबतीत लक्ष



द्यावे अशी मागणी सर्व सामान्य नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयाकडून "चला नदीला समजून घेऊ या" असा महत्त्वाचा उपक्रम भिवंडी तहसील कार्यालय विभागाकडून राबविण्यात आला होता मात्र महसूल विभाग व महापालिका प्रशासनानाने उपक्रमावर केवळ खर्च केला पण नदी स्वच्छ झाली नसल्याची माहिती नागरिकांनी दिली. नदी आणि खाडीला प्रदूषण मुक्त करण्यासाठी कोणतीही ठोस उपाययोजना न केल्याने भिवंडी शहर लगत असलेली कामवारी नदी आणि खाडी आजही प्रदूषित राहिली आहे.

**कामवारी नदीच्या पाण्यामध्ये दरवर्षी शहरातील हजारोच्या संख्येने गणपती व दुर्गादेवी मूर्त्यांचे विसर्जन केल्या जात आहे. त्यामुळे ही नदी स्वच्छ असली पाहिजे असे मत सार्वजनिक गणेशोत्सव महामंडळाचे अध्यक्ष मदन भोई,बजरंग दलाचे अध्यक्ष दादा गोसावी, अॅड.मनोज रायचा,माजी नगरसेवक नारायण चौधरी यांनी व्यक्त केली असुन शासनाने याबाबत लक्ष द्यावे अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.**

नदी आणि खाडीला प्रदूषण मुक्त करून शेतीला व जनावरांना पिण्यायोग्य पाणी प्रवाहीत केल्यास सदरचा परिसर सुजलाम सुफलाम होऊ शकतो अशी माहिती स्थानिक नागरीक देत आहेत.त्यामुळे राज्य सरकारने या बाबतीत लक्ष द्यावे अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

शहराच्या दक्षिणेला भिवंडी-वाडा मार्गावर वाहणारी कामवारी नदी तालुक्यातील ग्रामीणभागातील विविध गावातून शहराच्या सीमेवर आली आहे. हि नदी पुढे खाडीला मिळते. ग्रामीण शेतकऱ्यांना शेतीसाठी या नदीचे पाणी मिळावे म्हणून शहराच्या सीमेवर धरण बांधून नदीचे पाणी अडविले आहे.

पावसाळ्यात दुथडीभरून वाहणाऱ्या या नदीच्या शुद्ध पाण्याकडे अनेकांनी दुर्लक्ष केले आहे.परिणामी दरवर्षी पावसाचे पाणी भिवंडी-वाडा मार्गावर बांधलेल्या धरणांमधून उलटून खाडीच्या पाण्यात मिसळून जात आहे. त्यामुळे पुढे हे पाणी पुढील ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना उपयोगी पडत नाही.

भिवंडी-वाडा मार्गावरील शेलार ग्रामपंचायत हद्दीत मोठ्या प्रमाणावर कापडावर रंग प्रक्रिया करणाऱ्या डाईंग असून त्यामधून निघणारे केमिकल मिश्रित सांडपाणी नदीच्या व खाडीच्या पाण्यात सोडले जाते. त्यामुळे कामवारी नदीतून वाहणारे पाणी सध्या प्रदुषित झाले आहे. पाण्याचा रंग पिवळा झालेला दिसत आहे.शासन निर्णयानुसार केमिकलयुक्त पाणी नदीच्या अथवा खाडीच्या पात्रात सोडण्यास बंदी आहे. असे असताना राजरोसपणे हे केमिकलचा पाणी नदीच्या आणि खाडीच्या पात्रात सोडले जात याबाबत सामाजिक कार्यकर्ते अॅड. किरण चन्ने यांनी महसूल विभागाकडे तक्रारी केल्या आहेत. मात्र कोणत्याही प्रकारची ठोस कारवाई होत नसल्याने नदीची वाताहत झाली आहे.

या नदी आणि खाडीलगत असलेल्या महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात अतिक्रमण झाले असून त्यामधून निघणारे दुषित पाणी देखील नदी आणि खाडीच्या पात्रात सोडले जात आहे. या बाबत नागरिकांनी व विविध संस्थांनी अनेकदा निवेदने देत तक्रारी केल्या आहेत पण कोणत्याही प्रकारची ठोस उपाययोजना झाली नसल्याचे नागरिकांनी सांगितले.

## इस्त्राईलमध्ये नूतनीकरण बांधकाम क्षेत्रात

# जिल्ह्यातील युवकांसाठी रोजगाराची सुवर्णसंधी

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**रायगड:** शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागांतर्गत रायगड जिल्ह्यातील युवक-युवतींसाठी इस्त्राईलमध्ये नूतनीकरण बांधकाम क्षेत्रात मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत अशी माहिती जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्या सहाय्यक आयुक्त अ.मु. पवार यांनी दिली आहे.

विविध कामांसाठी पुढीलप्रमाणे जागा उपलब्ध-प्लॅस्टरिंग काम – 1000 जागा,सिरेमिक टाईल्स लावणी – 1000 जागा, ड्रायवॉल कामगार – 300 जागा,मेसन (गवंडी) – 300 जागा.


शैक्षणिक पात्रता- किमान दहावी उत्तीर्ण, अनुभव - संबंधित कामात किमान 3 वर्षांचा अनुभव आवश्यक.कौशल्य , इंग्रजी वाचन, लेखन आणि बोलणे याचे ज्ञान आवश्यक,आंतरिक नूतनीकरण कामात प्राविण्य,जुन्या इमारतींचे दुरुस्ती, संरक्षण व उन्नतीकरण कामाचा अनुभव, वयोमर्यादा 25 ते 50 वर्षे, मानधन (पगार) अंदाजे 1 लाख 62 हजार 500 प्रतिमहिना, कामाचे तास महिन्याला 182 तास, कामाचे दिवस कंपनीनुसार, महिन्यात 21 ते 26 दिवस, निवास व्यवस्था नियोक्त्याकडून, अन्नाची व्यवस्था उमेदवाराने स्वतः करायची आहे. वैद्यकीय विमा नियोक्त्याकडून, अतिरिक्त काम (ओव्हरटाईम) कंपनीच्या नियमांनुसार. करार कालावधी, पहिला व्हिसा वर्षाअखेरपर्यंत; त्यानंतर दरवर्षी नूतनीकरण होऊ शकते. कमाल कालावधी 63 महिने. कामाचे ठिकाण संपूर्ण इस्त्राईल, पोलीस क्लिअरन्स (PCC) अनिवार्य, व्हिसासाठी वैद्यकीय तपासणी उमेदवाराने स्वतः करून घ्यायची. मुलाखत प्रकार प्रत्यक्ष (समोरासमोर).

अधिक माहिती आणि ऑनलाइन नोंदणीसाठी https://maharashtrainternational.com, या अधिकृत संकेतस्थळाला भेट द्या.

# कल्याणात जलवाहिनी फुटल्याने शाळा सलग 3 दिवस बंद ठेवण्याची वेळ

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** कल्याण पश्चिमेच्या बैलबाजार परिसरातील केडीएमसीची मुख्य जलवाहिनी मंगळवारी फुटल्याने शहरातील पाणीपुरवठ्यावर आधीच परिणाम झाला आहे. त्यातच आता दुसरीकडे त्यामुळे या परिसरातील नामांकित के.सी. गांधी शाळाही सलग तीन दिवस बंद ठेवावी लागल्याने हजारो विद्यार्थ्यांच्या अभ्यासावरही त्याचा परिणाम होत आहे. परिणामी वाहतूक पोलीस आणि केडीएमसी प्रशासनाकडून शालेय विद्यार्थ्यांसाठी पर्यायी मार्ग उपलब्ध करून देण्याची मागणी के.सी. गांधी शाळा प्रशासनाकडून करण्यात आली आहे.



कल्याण पश्चिमेतील बैल बाजार परिसरात मेट्रो प्रकल्पाचे काम सुरू असून या कामादरम्यान शहराला पाणी पुरवठा करणारी मुख्य जलवाहिनी मंगळवारी दुपारच्या सुमारास फुटली. त्यामुळे संपूर्ण कल्याण पश्चिमेममध्ये पाणीबाणी निर्माण झाली. तर या जलवाहिनीच्या दुरुस्तीसाठी बैल बाजार ते गुरुदेव हॉटेलकडे येणारा रस्ता बंद ठेवण्यात आला आहे. हा रस्ता बंद ठेवल्यामुळे आधीच नागरिकांना मोठ्या वाहतूक कोंडीला सामोरे जावे लागत असतानाच दुसरीकडे या कल्याणातील सर्वात मोठ्या आणि नामांकित के. सी.गांधी शाळेलाही त्याचा फटाका बसला आहे.

बैलबाजार येथे ज्याठिकाणी या मेट्रो प्रकल्पाचे काम सुरू आहे, त्याच मुख्य मार्गावर के.सी. गांधी शाळा असून त्यामध्ये सुमारे 3 हजार विद्यार्थी आजमितीस शिकत आहेत. हा रस्ता एका बाजूने बंद

## विद्यार्थ्यांच्या अभ्यासावर होतोय परिणाम

करण्यात आल्याने शाळेमध्ये विद्यार्थ्यांना घेऊन येणाऱ्या बसेसची वाहतूकही ठप्प झाली आहे. शाळेत येणाऱ्या विद्यार्थ्यांची गैरसोय पाहता गेल्या बुधवारपासून आजपर्यंत शाळा बंद ठेवण्याची वेळ शाळा प्रशासनावर आली आहे. ज्यामुळे विद्यार्थ्यांच्या अभ्यासावर तर मोठा परिणाम होतच आहे. त्याशिवाय सध्या परीक्षेच्या हंगामासोबत विविध सांस्कृतिक, शैक्षणिक कार्यक्रमांचेही आयोजन करण्यात आले आहे.

मात्र सलग 3 दिवस शाळा बंद ठेवावी लागल्याने या उपक्रमांमध्ये सहभागी विद्यार्थ्यांवर परिणाम होत असल्याची माहिती शाळेच्या संचालिका स्वप्नाली रानडे यांनी दिली. तसेच विद्यार्थ्यांवर होणारे हे परिणाम पाहता संबंधित प्रशासनाने लवकरात लवकर हा रस्ता सुरू करावा किंवा अन्य पर्यायी मार्ग उपलब्ध करून देण्याची मागणीही करण्यात आली आहे.

दरम्यान यासंदर्भात केडीएसमी पाणी पुरवठा विभागाशी संपर्क साधला असता या जलवाहिनीच्या दुरुस्तीचे काम शुक्रवारी पहाटे पूर्ण झाले असून आज दुपारपर्यंत त्यावरून वाहतूक सुरू केली जाईल अशी माहिती कार्यकारी अभियंता महेश डावरे यांच्याकडून देण्यात आली.

## भिमराव धोरण (शेती)



अर्थ व्यवस्था कणा
महत्वाची असे शेती
भिमराव तव धोरणे
संयुक्तीक असे अति

बळीराजा हवासुखी
समृद्ध व्हावी माती
जोडावी त्याची नाळ
मुख्यप्रवाहाशी नाती

विरोध केला तेंव्हाचं
नको जाचक पध्दती
प्रयासेकोकणामधली
बंद पाडली ती खोती

सामुदायिक हो शेती
ठरवावी उचीत निती
बेठबिगारी घालवावी
नको रूढावल्या रिती

शेत माला उचीतभाव
पैसा जमवावा हाती
कोरा केला सातबारा
धन वृध्दी भरते खाती

सांभाळा शेतक-यांना
देशाची मजबूत शक्ती
बळीराजा सार्थ जाणे
भिमराव मनाचेतख्ती

बाळासाहेब खरोखरी
सार्थ ठरे तुमची उक्ती
तुमच्या मार्गावर चाल
समुध्द हो हरेक व्यक्ती

- हेमंत मुसरीफ, पुणे .
9730306996

# शाळा बंद आंदोलनच्या मागण्यांबाबत शिक्षक भारतीचे निवेदन

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**शहापूर ग्रामीण :** सर्वत्र शाळा बंद आंदोलनाची हाक दिल्याने या हाकेला शिक्षक भारती संघटनेने प्रतिसाद देऊन बंदमध्ये सहभाग घेतला व आपल्या मागण्यांचे निवेदन दिले. देशात संविधानानुसार लोकशाही प्रशासन असतांना शिक्षक व कर्मचारी यांच्यावर नेहमीच दबाव व भीतीदायी वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न शासन व्यवस्थेतून होताना दिसून येत आहे. शासन निर्णय 2013 पासून शिक्षक भरती करताना लागू केलेली टीईटी धोरण असतांना देश आणि राज्यातील पूर्वाश्रमिक शिक्षकांना टीईटीची परीक्षेसाठी अन्यायकारक सक्ती कशासाठी? त्याचबरोबर 15 मार्च 2024 च्या संच मान्यतेच्या जीआर नुसार राज्यातील अनेक शिक्षक सरप्लस होणार, तर लहान शाळा हजारोंच्या संख्येने बंद होणार. मराठी अनुदानित शाळा मोठया प्रमाणात बंद होवून विद्यार्थ्यांचे प्रचंड शैक्षणिक होणार आहे. म्हणून 5 डिसेंबर 2025 रोजी होणाऱ्या राज्यातील विविध शिक्षक कर्मचारी संघटनांच्या शाळा बंद आंदोलनाला शिक्षक भारती ठाणे जिल्हावतीने जाहीर पाठिंबा दिला आहे. तसेच, शासनाकडे



संघटनेच्या पुढील मागण्या मान्य न झाल्यास शिक्षक भारती तर्फे तीव्र आंदोलन केले जाईल. असा इशारा शिक्षक भारतीचे जिल्हाध्यक्ष एकनाथ तारमळे व सुरेश विशे यांनी दिला आहे.

१. 2013 पूर्वी सेवेत असलेल्या शिक्षकांना टीईटी सक्ती रद्द करावी.

2. 15 मार्च 2024 चा संच मान्यतेचा जीआर रद्द करून जुनी संच मान्यता धोरण राबवावे.

3. 1 नोव्हेंबर 2005 पूर्वी लागलेल्या व नंतर सेवेत रुजू झालेल्या शिक्षकांना जुनी पेन्शन योजना लागू करावी.

4. ठाणे जिल्ह्यात आदिवासी क्षेत्र व पेसा क्षेत्रात काम करीत असलेल्या शिक्षकांना कोर्टाच्या आदेशानुसार एकस्तर वेतन श्रेणी विनाअट त्वरित लागू करावी .

5. वस्तीशाळा शिक्षकांचे जुनी सेवा ग्राहय धरून सेवेचे सर्व लाभ देण्यात यावेत.

6. शिक्षकांना दररोज अशैक्षणिक ऑनलाईन व ऑफलाईन कामांपासून मुक्त करावे.

7. आंदोलनात सहभागी शाळा व शिक्षकांच्या वेतनातून एक दिवसाचा पगार कपात करू नये.

अशा अनेक मागण्या शासनाकडे सादर केल्या आहेत. आज शाळा बंद आंदोलन व मागण्या संदर्भात निवेदन मा. गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती, शहापूर यांच्यामार्फत शालेय शिक्षण मंत्री, शिक्षण उपसंचालक, शिक्षणाधिकारी यांना सादर केले आहे. यावेळी शिक्षक भारतीचे अध्यक्ष एकनाथ तारमळे, सुरेश विशे, शहापूर तालुका अध्यक्ष दिनेश वाघ कार्याध्यक्ष सुरेश भाकरे, अनिल निचिते, अनिल पाटील, बोंद्रे सर आप्पा घोडविंदे, सदानंद वरकुटे गुणवंत पाटील, हिवरे सर आणि इतर शिक्षक यावेळी उपस्थित होते.

# कवी नरेश परटोले यांच्या 'ओंजळ शब्दांची' या काव्यसंग्रहाचे प्रकाशन



**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**शहापूर ग्रामीण :** वासिंद जवळील अंबर्जे गावातील कवी नरेश शंकर परटोले यांच्या 'ओंजळ शब्दांची ' या काव्यसंग्रहाचे प्रकाशन करण्यात आले.

या काव्यसंग्रहाचे प्रकाशन संभाजीनगर येथील सुप्रसिद्ध गझलकार व मराठवाडा भूषण प्रा.डॉ. रेणुकादास भारस्वाडकर यांच्या हस्ते वाघिवली येथे दिगंबर पालवी यांच्या वास्तुच्या प्रांगणात करण्यात आले. यशवंत माळी यांनी काव्य संग्रहाचे रसग्रहण केले. या प्रकाशनावेळी ह.भ.प. शंकर महाराज परटोले, पोलीस पाटील कवी हरिश्चंद्र परटोले, सुनील परटोले, गणपतजी (तात्या) विशे, कवी जयराम कराळे, व आत्मउन्नती विश्वशांती अखिल भारतीय सदगुरू सेवा मंडळाचे सदस्य उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक शिवाजी शिंदे, सूत्रसंचालन जगदीश तुपे, जनार्दन अधिकारी यांनी केले तर समारोप कवी नरेश परटोले यांच्या मनोगत व आभार प्रदर्शनाने झाले.

**नियमित वाचा**
**दैं. ठाणे**
**जीवनदीप वार्ता**

# निसर्ग शाळा उपक्रमांतर्गत प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांनी बनवल्या पत्रावळी

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**पेण :** पेण तालुक्यातील रायगड जिल्हा परिषद मायनी कोयना प्राथमिक शाळेत निसर्ग शाळा उपक्रमांतर्गत एक आगळीवेगळी निसर्गभेट आयोजित करण्यात आली. या उपक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांना निसर्गाच्या अधिक जवळ नेणे, झाडे-फुले-पाखरांचे महत्त्व पटवून देणे व पर्यावरणपूरक जीवनशैलीचे भान निर्माण करणे हा होता.

या निसर्गभेटीमध्ये विद्यार्थ्यांनी झाडे, रंगीबेरंगी फुले, विविध पक्षी यांचे निरीक्षण केले. शिक्षकांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत निसर्ग संवर्धनाचे महत्त्व, जैवविविधतेची



गरज, तसेच झाडांमुळे मिळणारे लाभ याविषयी माहिती दिली. मुलांनीही उत्स्फूर्तपणे प्रश्न विचारत आपली जिज्ञासा व्यक्त केली.याचा एक विशेष आकर्षण म्हणजे पळसाच्या झाडांच्या पानांपासून पत्रावळी तयार करणे हा उपक्रम घेण्यात आला. विद्यार्थ्यांनी स्वतः पानं गोळा करून, त्यांना जोडून सुंदर, स्वच्छ आणि पर्यावरणपूरक पत्रावळी तयार केल्या. नैसर्गिक साधनांचा वापर करून उपयुक्त वस्तू तयार करता येतात, हा महत्त्वाचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

उपक्रमाचा शेवट अत्यंत आनंदी वातावरणात झाला. विद्यार्थ्यांनी स्वतः तयार केलेल्या पत्रावळींवरच स्नेहभोजनाचा आस्वाद घेतला. स्वहस्ते तयार केलेल्या पत्रावळींवर भोजन करणे हा अनुभव विद्यार्थ्यांसाठी नवलाईचा आणि आनंददायी ठरला.शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षकवर्ग तसेचस्थानिक ग्रामस्थ यांच्या सहकार्यामुळे हा उपक्रम यशस्वी पार पडला. पर्यावरणपूरक जीवनशैलीचा संदेश देत, मुलांमध्ये निसर्गप्रेमाची बीजे रोवण्याचे कार्य या निसर्गभेटीने प्रभावीपणे पार पाडल्याचे मत यावेळी मुख्याध्यापक रामकृष्ण भोईर यांनी यावेळी व्यक्त केले.







Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.
Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024